९७४/९९३

**महत्वाचे**
**बैठक दिनांक १८/०१/२०१४.**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४/शिष्य/आ.बैठक/पुवि/२०१३-१४/
शिक्षण उपसंचालक, कार्यालय,
पुणे विभाग, पुणे-१
दिनांक :- 13 JAN 2014

प्रति,
१.शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
पुणे/सोलापूर/अहमदनगर
२.शिक्षण प्रमुख, महानगरपालिका, पुणे/ पिंपरी चिंचवड.
३.प्रशासन अधिकारी नगरपालिका सोलापूर/अहमदनगर
४. सर्व गटशिक्षणाधिकारी पुणे/सोलापूर/अहमदनगर.
५. अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक)
पुणे/सोलापूर/अहमदनगर

**विषय: विद्यार्थी वैयक्तिक लाभाच्या शिष्यवृत्ती योजना व शालार्थ योजनेचा आढाव्याबाबत.**
संदर्भ: संचालनालयाचे पत्र क्र.शिसं/शिष्य/२०१२-१३/क्र.२२६/४९३ दि.१०/०१/२०१४.

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेमार्फत विविध लाभांच्या विविध योजनांची अंमलबजावणी क्षेत्रीय अधिका-यांमार्फत करण्यात येते. यामध्ये रुपये ३०००/- मुलींना प्रोत्साहन भत्ता, राजमाता जिजाऊ सायकल वाटप योजना, विविध शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी, शालार्थ या बाबींचा समावेश होतो. संचालनालयाने या सर्व योजनांचा आढावा घेणेसाठी **दिनांक १८/०१/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता सातारा येथे बैठक आयोजित केलेली आहे.**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व प्रशासन अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी यांना सदर बैठकीसाठी आवश्यक त्या माहितीसह उपस्थित राहणेबाबत सूचना देण्यात याव्यात. बैठकीचे ठिकाण यथावकाश कळविणेत येईल यांची नोंद घेण्यात यावी. **बैठकीचे स्थळ विभागीय शिक्षण उपसंचालक कोल्हापूर यांचेकडून निश्चित होणार असल्याने सदर बैठकीचे स्थळ या कार्यालयाच्या वेबसाईटवर पत्रान्वये प्रसिध्द करण्यात येईल. तरी आपण वेळोवेळी या कार्यालयाचे वेबसाईट तपासून बैठकीचे स्थळ बाबत माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी.**

**तसेच सदर योजनांबाबतची माहितीची एक प्रत दिनांक १६/०१/२०१४ पूर्वी या कार्यालयास ई-मेल/ फॅक्सद्वारे सादर करण्यात यावी.**

(धनाजी बुटे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
मा. शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र पुणे-१.

d/bhakti/gov letter

(प्राथमिक/माध्यमिक), महानगरपालिका, नगरपरिषदा प्रशासन अधिकारी, गटशिक्षणाधिकारी अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) यांची एकत्रित सभा पुढीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | दिनांक | वेळ | बैठकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई व नाशिक विभाग | १६.१.२०१४ | स. १०.३० वा. | नाशिक |
| २ | औरंगाबाद व लातूर विभाग | १७.१.२०१४ | स. १०.३० वा. | औरंगाबाद |
| ३ | पुणे व कोल्हापूर विभाग | १८.१.२०१४ | स. १०.३० वा. | सातारा |
| ४ | अमरावती विभाग | २८.१.२०१४ | स. १०.३० वा. | अमरावती |
| ५ | नागपूर विभाग | २९.१.२०१४ | स. १०.३० वा. | नागपूर |

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांनी बैठकीचे ठिकाण निश्चित करावे. बैठकीचे ठिकाणी [redacted] मोठे दोन एलसीडी स्क्रीन, प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा, स्पीकर व्यवस्था इत्यादि व्यवस्था असणाऱ्या ठिकाणच निवड करावे. तसेच संचालनालयास कळवावे. बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळवावे व तसे संचालनाल्यास अवगत करावे.

(सर्जेराव जाधव)
शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रत माहितीस्तव अग्रेषित.

१. मा. मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२.
२. मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण) शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे-१.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी-

१. श्री.शशिकांत शुक्ल, ॲक्सेंचर मॅनेजमेंट कन्सल्टींग.
२. श्री.मनिष ग्रोवर, ॲक्सेंचर मॅनेजमेंट कन्सल्टींग.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
13 JAN 2014
आवक नोंदवही क्रमांक ९५८

क्र.शिस/शिष्य/२०१२-१३/क्र.२२६/६१९
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे- १
दिनांक : १०/०१/२०१४

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

विषय :-<u>विद्यार्थी वैयक्तिक लाभाच्या शिष्यवृत्ती योजना व शालार्थ योजनेचा आढाव्याबाबत.</u>

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्यामार्फत विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांची अंमलबजावणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते. यामध्ये रुपये ३०००/- मुलींना प्रोत्साहन भत्ता, राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना, विविध शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी, शालार्थ या बाबींचा समावेश होतो.

शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाअंतर्गत पूर्व माध्यमिक, (MSS), माध्यमिक शिष्यवृत्ती (HSS), राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (NMMS), अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती या चार शिष्यवृत्त्यांची माहिती ऑनलाईन भरण्यासाठीचे ॲप्लिकेशन www.schoolmaharashtra.gov.in या वेबसाईटवर अपलोड केलेले आहे, या ॲप्लिकेशनमध्ये सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची व इतर माहिती भरण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करावयाची आहे. याबाबतच्या सूचना यापूर्वीच आपणास दिलेल्या आहेत. दिनांक २२.७.२०१० च्या शासन निर्णयानुसार शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची सर्व माहिती या ॲप्लिकेशनमध्ये असून, या सर्व विद्यार्थ्यांची बँकेची तपशिलवार माहिती भरावयाची आहे.

शालार्थ योजनेअंतर्गत पथदर्शी जिल्हयांनंतर राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये या योजनेची अंमलबजावणी सुरु झालेली असून, जानेवारी पेड इन फेब्रुवारी महिन्याची वेतन देयके या प्रणालीतून सादर करावयाची आहेत. या यासाठीचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग यापूर्वीच घेण्यात आले असून, आपणामार्फत सर्व मुख्याध्यापक व तज्ञांना मार्गदर्शन केलेले आहे. या बाबींचा आढावा घेणे अपेक्षित आहे.

शिष्यवृत्ती योजना, शालार्थ, मुलींना प्रोत्साहन भत्ता, राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना या योजनांचा आढावा घेण्यासाठी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी